इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या ३१ क्रमांक (दिनांक २९/१/८३ रोजी संपन्न झालेल्या सभेच्या बैठकीत अंतर्गत मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या १४२ व्या बैठकीतील दुरुस्ती व पुनर्बांधणी विभागासंबंधी विषयाचा इत्यादी करण्यात आलेला कार्यवृत्तांत.

## मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई.

### सचिवालयीन शाखा.

बाब क्रमांक : १४३/१

बुधवार दिनांक २८ ऑक्टोबर १९९२ रोजी सकाळी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन, वान्द्रे [पूर्व] येथील तिसऱ्या मजल्यावरील सभागृहात संपन्न झालेल्या मुंबई मंडळाच्या १४२ व्या बैठकीचा दुरुस्ती व पुनर्बांधणी विभागासंबंधी विषयाचा कार्यवृत्तांत.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| | | | |
|---|---|---|---|
| १] | श्री. विजय कांबळे | : | सभापती |
| २] | श्री. र. शं. राठोड | : | उपसभापती |
| ३] | श्रीमती शकुंतला राव | : | |
| ४] | श्री. मोहम्मद हनिफ खान | : | |
| ५] | श्री. श्रीकांत उपाध्याय | : | |
| ६] | श्री. फिलीप डसो | : | सदस्य |
| ७] | श्री. कमलाकर शर्मा | : | |
| ८] | श्री. फारुख मन्सुरी | : | |
| ९] | श्री. वसंत द्वा. देसाई | : | |
| १०] | श्री. क. ना. राक्यांधी, कार्यकारी अभियंता [दु. व पु.] आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांचे प्रतिनिधी. | : | प्रतिनिधी |
| ११] | श्री. शंकरराव पिटला | : | |
| १२] | श्री. हेमराज शाह | : | सहसदस्य. |
| १३] | श्री. ताहिरभाई कपासी | : | |

श्री. प्रकाश बिनसाळे, श्री. शंकरराव जाधव, श्री. बशीर पटेल आणि उपसंचालक, नगररचना [मुंबई] हे सदस्य या बैठकीस अनुपस्थित होते. श्री. प्रकाश बिनसाळे व श्री. शंकरराव जाधव आणि उपसंचालक, नगररचना [ मुंबई] यांनी अनुपस्थितीचे कारण कळविले होते. बैठकीत त्याची नोंद घेण्यात आली.

क्रमाप/-

बैठकीच्या सुरवातीस मा. सभापती/ मुंबई मंडळ यांनी दिवाळीच्या आणि नूतन वर्षाच्या शुभेच्छा सन्माननीय सदस्य/ सहसदस्य, अधिकारी व कर्मचारी यांना दिल्या.

बैठकीचे रितसर विषय चर्चेला घेण्याअगोदर राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्प, प्राधिकरण यांच्या अधिकार क्षेत्रातील कामासंबधीचा माहे सप्टेंबर ९२ चा प्रगती अहवाल संचालक, राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्प, प्राधिकरण यांचे प्रतिनिधी म्हणून मंडळाच्या बैठकीस हजर असलेले कार्यकारी अभियंता श्री. नलावडे यांनी बैठकीत सादर केला. सदरहू अहवालाची बैठकीत नोंद घेण्यात आली.

सचिव/ मुंबई मंडळ यांनी मा. सभापती/ उपसभापती, सर्व सन्माननीय सदस्य, सहसदस्य व अधिकाऱ्यांचे स्वागत केले व त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा व्यक्त करुन मा. सभापती/ मुंबई मंडळ यांचे परवानगीने बैठकीचे कामकाजास सुरवात केली व कार्यसूचीवरील बाबी चर्चे घेण्यात आल्या.

बाब क्रमांक : १४२/२

विषय :- मुंबई मंडळाच्या दि. २८.९.९२ रोजी झालेल्या १४१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणे

मुंबई मंडळाच्या १४१ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतातील पान क्रमांक -१६ वरील ठराव क्रमांक -१४१/१७७२ कडे सन्माननीय सहसदस्य श्री. हेमराज शाह व सदस्य श्री. वसंत द्दा. देसाई यांनी लक्ष वेधून ६० दिवसांचे आंत-बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून परवानगी न मिळाल्यास मुंबई मंडळाने काम सुरु करावे अशा ओळीची वरील ठरावात भर घालण्या-विषयी सूचित केले. तदनंतर झालेल्या चर्चेत सभापती/ मुंबई मंडळ, सन्माननीय सदस्य श्री. फारुख मन्सुरी व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्तांचे प्रतिनिधी व मुख्य अभियंता, मुंबई मंडळ यांनी भाग घेतला व तदनंतर वरील ठरावात सन्माननीय सदस्यांनी सुचविल्या प्रमाणे "८" ६० दिवसांचे आत

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून परवानगी न मिळाल्यास मुंबई मंडळाने मंडळामार्फत काम सुरु करावे" अशी नवी भर घालण्याविषयी ठरविण्यात आले. तदनंतर मुंबई मंडळाच्या दिनांक २८.९.९२ रोजी संपन्न झालेल्या १४१ व्या बैठकीचे कार्यवृत्तात वरील दुरुस्तीसह एकमताने स्थायी करण्यात आले.

बाब क्रमांक : १४२/२

विषय :- अनुपालन अहवाल.

अनुक्रमांक - १, बाब क्रमांक :९१/२, दि. १७.१२.८८.

विषय :- संक्रमण शिबिरातील गाळे वाटपासंबंधीची माहिती..

संक्रमण शिबिरातील माहे सप्टेंबर १९९२ अखेर वितरण केलेल्या गाळ्यांची नोंद घेण्यात आली.

अनुक्रमांक - २. बाब क्रमांक :१३१/३०.

विषय :- पुनर्रचित इमारतीतील गाळे वाटपासंबंधीची माहिती.

पुनर्रचित इमारतीतील माहे सप्टेंबर १९९२ अखेर वितरण केलेल्या गाळ्यांची नोंद घेण्यात आली.

अनुक्रमांक - ५. बाब क्रमांक : १००/७ दि. २८.६.८९.

विषय :- पुनर्रचित इमारतीतील गाळ्यांचा भाडे वसुलीचा तक्ता [माहे सप्टेंबर १९९२].

पुनर्रचित इमारतीतील गाळ्यांचा माहे एप्रिल १९९२ ते मार्च १९९३ पर्यंतच्या भाडेवसुली विषयीची नोंद घेण्यात आली.

क्रमाप/-

(३०)

ब ४

बाब क्रमांक : १४२/३

विषय :- मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतींवर जाहिरात फलक [होर्डिंग] वर मुंबई मंडळाने फी आकारण्याबद्दल..

वरील विषयाच्या चर्चेत भाग घेतांना सन्माननीय सदस्य श्री. वसंत द्वा. देसाई यांनी वरील प्रस्तावाचे प्रयोजन काय आहे ? आणि मंडळाला त्यापासून फी मिळण्यास वाव कसा आहे ? अशी विचारणा केली. त्यावर उपमुख्य अभियंता [दक्षिण] मुंबई मंडळ यांनी स्पष्टीकरण केले व वरील प्रस्ताविषयी संपूर्ण विवेचन मंडळास केले. मंडळाने सदर बाबींची नोंद घेतली आणि याबद्दल समितीने केलेल्या शिफारशी स्विकारल्या व खालीलप्रमाणे ठराव एकमताने संमत करण्यात आला.

ठराव क्रमांक : १४२/१७७३

मुंबई बेटावरील उपकरप्राप्त इमारतीवरील जाहिरात फलक [होर्डिंग] लावण्यासाठी मुंबई मंडळाने नेमलेल्या समितीने दिलेल्या शिफारशी मंडळाने स्वीकारल्या. सदर शिफारशी खालीलप्रमाणे.

[१] मंडळाला या जाहिरातीचे [होर्डींग] उत्पन्न मिळावे म्हणून मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या आताच्या चालू नियमांत बदल करून जाहिरात-दारास उपकरप्राप्त इमारतीच्या बाबतीत मंडळाचे " ना हरकत प्रमाणपत्र" आणण्याविषयी सूचित करेल, अशी विनंती करण्यांत यावी.

[२] वरील " ना हरकत प्रमाणपत्र" देतांना मंडळाने जाहिरातदाराला रुपये २५ /- प्रति चौ.मी. प्रति वर्षी याप्रमाणे शुल्क आकारावे.

[३] यापुढे जाहिरातदारांना फलक [होर्डींग] मुंबई मंडळाचे " ना हरकत प्रमाणपत्र" आपल्याशिवाय [वरील प्रमाणे शुल्क मुंबई मंडळाने घेतल्यावरच ] लावण्यास परवानगीचे नुतनीकरण करण्यांत येवू नये, अशी मुंबई महानगरपालिकेला विनंती करण्यांत यावी.

[४] उपकरप्राप्त इमारतीवरील जाहिरातदारांना फलक लावण्यासाठी वर प्रस्तावित केलेले " ना हरकत प्रमाणपत्र" दुरूस्ती विभागाच्या कार्यकारी अभियंता यांनी देण्यासाठी योग्य ते अर्जाचे नमुने व कार्यपध्दती निश्चित करण्यात यावी.

[५] मोक्याच्या रस्त्यावरील पुनर्रचित इमारतीवर जाहिरात फलक [होर्डिंग] लावण्यासाठी जाहिरातदारांकडून देकार मागविण्यासाठी निरनिराळ्या वर्तमानपत्रांत जाहिरात देऊन निविदा/ अर्ज मागविण्यात यावेत व त्याबद्दल मंडळाचे "ऑक्युपन्सी चार्जेस" द्वारा उत्पन्न वाढवावे.

मानानीय सभापतींच्या परवानगीने आयत्यावेळी घेतलेल्या बाबी :

बाब क्रमांक : १४२/१०.

विषय :- पुनर्रचित इमारतीतील गाळ्यांचे वाटप.

या बाबीवर सांगोपांग चर्चा होवून खालील ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

ठराव क्रमांक : १४२/१७७९

[१] ज्या इमारतींची पुनर्रचना होणार आहे परंतू ती अद्याप झालेली नाही व त्या जुन्या इमारतींतील गाळ्यांपेक्षा कमी गाळे बांधले जाणार आहेत, अशा इमारतींच्या पुनर्रचित आराखड्यास महापालिकेने मंजूरी देताच सोडत काढून गाळ्यांच्या वाटपाचा क्रम ठरवावा व सोडतीत जे यशस्वी होणार नाहीत, त्यांचा बृहत्सूचित समावेश करून त्यांना अन्य पुनर्रचित इमारतींतील अतिरिक्त गाळ्यांचे वाटप करावे.

[२] ज्या भाडेकरूंना जुन्या इमारतींच्या जागी पुनर्रचित केलेल्या इमारतीत जागा मिळण्याचा आग्रह नसेल

त्यांच्याकडून पुनर्रचित इमारतीत जागा मिळण्याचा हक्क सोडून दिल्याचे वचनपत्र [अंडरटेकींग] घेऊन त्यांचा बृहतसूचीत समावेश करुन त्यांना इतर पुनर्रचित इमारतींतील अतिरिक्त गाळ्यांमधून वाटप करावे.

[३] ज्या इमारतीच्या पुनर्रचनेसाठी मंडळाने सादर केलेल्या नकाशास महानगरपालिकेने मंजूरी दिलेली आहे व त्या इमारतीच्या पुनर्रचनेसाठी विकासक किंवा भाडेकरुंच्या सहकारी संस्थेस मंडळाने " ना हरकत प्रमाणपत्र " दिलेले आहे परंतु त्या जुन्या इमारतींतील भाडेकरुंना आधीच अन्य पुनर्रचित इमारतीत जागा दिलेली असेल तर त्यांचे हक्क त्या इमारतीत राहणार नाही असे हमीपत्र घेण्यांत येईल.

यानंतर सचिव/ मुंबई मंडळ यांनी मा. सभापती/ मुंबई मंडळ, उपसभापती तथा मुख्य अधिकारी/ मुंबई मंडळ, सन्माननीय सहसदस्य तसेच उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांचे मनःपूर्वक आभार मानले व सभापतींच्या संमतीने बैठकीचे कामकाज दुपारी १२.१५ वाजतां संपविण्यांत आले.

सभापती,
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,
मुंबई.

[signature]
२८-१-९३
सभापती
मुंबई दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ

[signature]
सचिव
मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

Continued on 28/12/92
29/1/93
3rd meeting